पुढारी

# सांगलीत आजपासून युवा महोत्सवाची धूम; ८० महाविद्यालयांचा सहभाग

**सांगली : प्रतिनिधी**

येथील विलिंग्डन महाविद्यालयात युवा महोत्सवाची धूम बुधवार (दि. ३१) पासून तीन दिवस रंगणार आहे. त्याची जोरदार तयारी सुरू आहे. महोत्सवात सांगली, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यांतील ८० महाविद्यालयांचे संघ सहभागी होणार आहेत.

तीन दिवस होणाऱ्या या युवा महोत्सवात एकांकिका, सुगमगायन, समूह गायन, लघुनाट्य, मूकनाट्य, शास्त्रीय सूरवाद्य, एकपात्री अभिनय, शास्त्रीय नृत्य, शास्त्रीय गायन, प्रश्नमंजूषा, लोकवाद्यवृंद, लोककला, पाश्चिमात्य एकल गायन, वादन, लोकनृत्य, मातीकाम, मेंदी, रांगोळी, स्पॉट फोटोग्राफी, स्थळचित्रण आदी कलाप्रकार असणार आहेत. हे सर्व कार्यक्रम महाविद्यालयाचा खुला मंच, वेलणकर हॉल, कांतीलाल शहा प्रशाला, ॲप्लाईड सायन्सेस इमारत आणि महाविद्यालयाच्या परिसरात होणार आहे. महोत्सवाच्या निमित्ताने महाविद्यालय आणि परिसर सजवण्यात आला आहे.

उद्‌घाटन समारंभ सकाळी ९.३० वाजता खा. संजय पाटील, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, महापौर संगीता खोत, डॉ. रवींद्र खोत यांच्या उपस्थितीत होत आहे.

पारितोषिक वितरण शुक्रवारी (दि. २) दुपारी ४ वाजता होणार आहे. त्या समारंभास पालकमंत्री सुभाष देशमुख, आ. सुधीर गाडगीळ, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आदी उपस्थित राहणार आहेत. ही माहिती महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किशोर पंडित, प्राचार्य डॉ. भास्कर ताम्हनकर यांनी दिली.